जनहिताय सर्वदा

**महाराष्ट्र शासन**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
Email ID : desk१०c-cmtd@mah.gov.in

**क्रमांक** : संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०२ /१ स

**दिनांक :** २३.०१.२०२६

प्रति,

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
पुणे.

**विषय:-** सेवा विषयक बाबीच्या अनुषंगाने १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम गुणांकन महामंडळाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत...

**संदर्भ :-**१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.२७/का.१२ (सेवा) दिनांक ०९ जून, २०२५ व दिनांक १६ सप्टेंबर, २०२५.
२) शासनाचे समक्रमांकाचे पत्र, दि.०७.०१.२०२६.
३) आपले पत्र, दि.१९.०१.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयास व संदर्भाधीन पत्रांस अनुसरून आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन शासन निर्णय व शासन परिपत्रकांन्वये मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत सेवाविषयक बाबीच्या सुधारणाकरिता प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम, आयोग याचे स्तरावर सेवाकर्मी कार्यक्रम राबविण्यावाचतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

आपल्या संदर्भाधीन पत्र क्र.३ अन्वये प्राप्त माहितीच्या आधारे, सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य वखार महामंडळास दिलेले गुणांकन सोबत जोडले असून सदर गुणांकन महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे, ही विनंती.

आपली,

(अस्मिता पाटील)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

विवरणपत्र-३

| महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचे<br>सा.प्र.वि., शानि., दि.९.६.२०२५ नुसार केलेले गुणांकन | | | | |
|---|---|---|---|---|
| दीर्घकालीन उद्दिष्ट | | | | |
| अ.क्र. | मुद्दा | तपशील | प्रस्तवित गुण | गुणांकन |
| १ | कार्यालयाचा सुधारीत आकृतीबंध तयार करण्यात आला आहे का? | महामंडळाच्या संवर्गनिहाय १३१४ पदाचा आकृतीबंध सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. वखार १४१३/प्र.क्र.२१२/१-स दि.२७.०२.२०१५ अन्वये, मंजूर करुन घेण्यात आला आहे. | १० | १० |
| २ | **सेवाप्रवेश नियम-** कायालयातील एकूण संवर्गापेको किती संवर्गाचे संपाप्रवेश नियम तयार करण्यात आले आहेत व अद्ययावत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली याचे प्रमाण | महामंडळाच्या संवर्गनिहाय सरळसेवा व पदोन्नतीच्या पदांसाठी सेवा प्रवेश नियम शेक्षणिक अर्हतेनुसार Maharashtra State The Warehousing Corporation (Staff Recruitment Polices and Procedures) Rules, २०१५ नुसार राजपत्रीत करण्यात आले आहेत. | १० | १० |
| मध्यम मुदतीची उद्दिष्टे | | | | |
| ३ | **जेष्ठतासूची -**<br>सर्व संवर्गाची अद्ययावत जेष्ठतासूची प्रसिध्द करणे कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील किती संवर्गाच्या वर्ष २०२४-२५ ची ज्येष्ठतासूची अद्ययावत फरुन प्रसिद्ध केल्या आहेत? | महामंडळाची सर्व सर्वर्गनिहाय, सर्व कर्मचारी /अधिकाऱ्यांची सेवापुस्तीका विषयक सर्व तपशीलवार (जन्मदिनांक, नियुक्ती दिनांक, जातीसंवंग, सेवानिवृत्ती दिनांक, जातीप्रर्वग, शैक्षणिक अर्हता, इ.) माहिती सेवाज्येष्ठता सुची अन्वये महामंडळाच्या संकेतस्थळावर दरवर्षी प्रसिध्द करण्यात येते. त्यानुसार सन २०२४ अखेर चौ अंतीम सेवाज्येष्ठता यादी दि.१३ मार्च २०२५ रोजी महामंडळाच्या संकेत स्थळांवर प्रसिध्द केली. | १० | १० |
| ४ | **पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती -**<br>कार्यालयात सद्यस्थितीतील पदोत्रतीच्या फांट्यातील रिक्त पदांचे प्रमाण | महामंडळातील कर्मचारी/ अधिकाऱ्यांना वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या शासन निर्णयानुसार तसेच महामंडळाच्या सेवाप्रवेश नियमांचे निकष पुर्ण करणाऱ्या व सेवाप्रवेश नियमात संवर्गनिहाय ठरवून | १० | २.३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दिलेल्या टक्केवारीनुसार पुढच्या पदावर पदोन्नत केले जाते. त्यानुसार निवडसूची वर्ष २०२३-२०२४ ची पदोन्नती बैठक दि.१४.०८.२०२३ रोजी घेऊन त्या संवर्गाची पदोन्नती प्रक्रिया पार पडण्यात आली आहे. त्यानुसार एकूण पदोन्नतीसाठी पात्र ६५ कर्मचाऱ्यांपैकी ५० पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. | | |
| ५ | **सरळसेवा नियुक्ती रिक्त पदे स्थिती** - कार्यालयात सरळसेवा नियुक्तीमधील रिक्त पदांचे प्रमाण | आकृतीबंधानुसार मंजूर केलेल्या तसेच शासनाकडून मान्यता मिळालेल्या पदांची बिंदूनामावली मागासवर्गीय कक्षाकडून मंजूर करून घेतल्यानंतर सेवाप्रवेशातील नियमांनुसार सरळसेवेच्या पदांवर शासनमान्य संस्थेकडून भरती करण्यात येते. सद्यस्थितीत सरळसेवेने ९३१ मंजूर पदे असून त्यापैकी १६७ पदे कार्यरत असूत ७६४ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्यास शासनाकडून जी मंजूरी मिळते त्यानुसार भरती प्रक्रिया राबवली जाते. सद्यास्थितीत ३०२ पदांकरीता भरती प्रक्रिया प्रगती पथावर आहे. | १० | ८.२ |
| ६ | **बिंदु नामावली प्रमाणीकरण**- कार्यालयातील एकूण संवगपिकी किती संवर्गाच्या बिंदु नामावली प्रमाणित करुन घेतल्या आहेत ? | शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार व मान्यताप्राप्त पदांची बिंदुनामावली नियुक्तीच्या जातीप्रवर्गानुसार मागासवर्गीय कक्षाकडून वर्ग - ३ ची दि. ११.०७.२०२४, वर्ग ०४ ची दि. १०.१२.२०२४ व वर्ग ०२ ची दि.१७.०१.२०२५ रोजी मंजूरी मिळाली आहे. | १० | १० |
| ७ | **अनुकंपा नियुक्ती** - कार्यालयास अनुकंपा नियुक्ती लागू एकूण उपलब्ध पदांपैकी किती पदांवर नियुक्या देण्यात | शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच महामंडळात सेवेत कार्यरत असताना निधन झालेल्या कर्मचारी / अधिकारी यांचे वारसास, शासन | १० | १० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आल्या आहेत त्याचे प्रमाण | निर्णयानुसार आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर अनुकंपा प्रतिक्षायादी प्रसिध्द करुन ज्येष्ठता क्रमांकानुसार पात्र वारसदांराची महामंडळातील वर्ग क व वर्ग ड च्या रिक्त पदांची गणना करुन नियुक्ती करण्यात येते. सन २०२४ अखेरची अनुकंपा तत्वावर उपलब्ध ०६ पदापैकी वर्ग ड चे ०६ पदे भरण्यात आली आहे. तसेच सद्यस्थितीत अनुकंपा तत्वावर सर्व पात्र उमेदवारांना नियुक्ती देणेत आली आहे. | | |
| ८ | IGOT - रजिस्ट्रेशन आणि ५ कोर्स पुर्ण करणे | -- | १० | -- |
| ९ | **सेवापुस्तक** - सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्यावयत करणे व डिजिटाईझ करणे | महामंडळाची सर्व सवंर्गनिहाय, सर्व कर्मचारी /अधिकारी यांच्या सेवापुस्तीकेत सर्व तपशीलवार माहिती जसे की, जन्मदिनांक, नियुक्ती दिनांक, जातीसंर्वग, सेवानिवृत्ती दिनांक, जातीप्रर्वग, शैक्षणिक अर्हता, उपभोगलेल्या सर्व प्रकारच्या रजा, देण्यात आलेली पदोन्नती, कर्मचारी / अधिकारी यांच्यावर करण्यात आलेली कारवाई इ. या सर्व नोंदी अद्यावत करण्यात येते. | २० | २० |
| | | | १०० | ८२ |

आपली,

(अस्मिता पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.